# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे.

नोंदणी क्र. पीएनए / जिउनी (शहर) / जीएनएल / (ओ) / १५७/२०२०-२१/सन-२०२१ दि. २९/९/२०२१

अध्यक्ष : डॉ. मोरेश्वर सुखदेवे

उपाध्यक्ष : प्रा. गौतम मगरे


दिनांक : ०८/०५/२६

जा.क्र.बो धि स रु म / २०२६-२८/९६

दि.०५ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या चौथ्या वार्षिक सर्वसाधारण सभे मधील विषय क्रमांक ११ नुसार उपविधी दुरुस्ती अहवाल जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर यांच्याकडे पाठविण्यात आला होता. खालील पोटनियमांवर ज्ञापन करण्यात आले.

| | पोटनियम क्रमांक | ज्ञापन ( मंजूर पोटनियम) |
|---|---|---|
| १ | नियम क्रं. ७ अ आणि नियम क्रं. ७-ब | **७ अ) क्रियाशील सभासद :-** प्रत्येक वर्षी (वार्षिक) वर्गणी सभासदाने रु. २०००/- (दोन हजार अक्षरी) देणे अनिवार्य राहील, या व्यतिरिक्त प्रथम पाच वर्षात किमान रु.५०,०००/-(पन्नास हजार) बिनव्याजी ठेवी किंवा किमान रु.२०,०००/- (अक्षरी वीस हजार) देणगी दिली पाहिजे.<br>**७ ब )अक्रियाशील सभासद :-** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ मधील तरतुदीचे पालन करणे अनिवार्य राहील.<br>**टीप :-** अशा रितीने जमा झालेल्या वर्गणीचे रक्कम प्रत्येक सभासदाच्या नावे १०० भागाच्या रचनेपर्यंत भागापोटी जमा केली जाईल व त्यापुढे जमा होणारी रक्कम संचित ठेव (Cumulative deposit) ठेव म्हणून जमा राहील. अशा प्रकारे संचित ठेवीवर व्याज अनुज्ञेय नाही. |
| २ | नियम क्रं. १२ | **१२.** सभासदाने घेतलेल्या भागाचा त्यास संस्थेने भाग दाखला दिला पाहीजे. सभासदांनी भाग प्रमाणपत्र संस्थेच्या कार्यालयातून प्राप्त करणे. |
| ३ | नियम क्रं. ३० अ | **३०.(अ)** संस्थेच्या संचालकमंडळामार्फत संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहिजे. संचालक मंडळात निवडून येणारे एकूण ११ संचालक असतील, संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापर्यंत पुढे ५ वर्ष इतका राहील तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा कालावधी संस्थेच्या संचालक मंडळाच्या कालावधी इतका राहील. निवडून आलेल्या संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे राहील.:-<br>१. अनुसुचित जाती व नवबौध्द सभासद प्रतिनीधी ............... .....-०६<br>२.अनुसुचित जमाती सभास प्रतिनिधी ..........................................-०१<br>३.ईतरमागासवर्गीय सभासद प्रतिनिधी ................................ ....- ०१<br>४.वि.जा./भ.ज./विमाप/सभासदप्रतिनिधी.............................. -०१<br>५.महिला सभासद प्रतिनिधी.................................................- ०२ |


पुणे इंटरनॅशनल स्कूल, लेन नं. १४, आदर्श नगर, विद्यानगर, टिंगरेनगर, पुणे - ४११०३२.

Email : bodhisatva29@gmail.com संपर्क : ९०९६७९४९३९

| | | |
|---|---|---|
| | | एकूण............................................................................११(अकरा)<br>वरील एकूण ११ (अकरा) प्रतिनीधीपैकी ०४ (चार) प्रतिनिधी वैद्यकीय व्यवसायिक असणे अनिवार्य राहील. वरील संचालक पद संस्थेच्या सभासदांमधून निवडणुकीद्वारे भरली जातील व सदर<br>निवडणूक ही राज्यसहकारी निवडणूक प्राधिकरण ही राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल, समितीची आणि तिच्या सदस्यांची संचालकपदी निवडणूक घेण्यास निरर्हता पुढील नियमाप्रमाणे लागू राहील.<br>१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ आणि संस्थेच्या मंजुर उपविधीतील तरतुदीनुसार अपात्रता धारण करणारा.<br>२. कलम ७३ क अ (१) आणि नियम ५८ मधील तरतुदीनुसार अपात्रता धारण करणारा.<br>३ . कलम २६ मधील तरतुदीनुसार अपात्रता धारण करणारा, |
| ४ | नियम क्रं. ३४ | **३४**.संचालक मंडळाच्या सभेची गणपूर्ती (कोरम) होण्यास पोटनियम क्र.३० (अ) मध्ये नमुद संचालक सदस्यांपैकी ०६ (सहा) सभासद सभेस उपस्थित असल्यास गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. पोटनियम क्र.३० (ब) मधील संचालक, गणपूर्ती साठी गणले जाणार नाहीत. |
| ५ | नियम क्रं. ४७ | **४७.:- सभासदांची जबाबदारी व कर्तव्ये पुढील प्रमाणे**<br>१. संस्थेने दिलेले ओळखपत्र प्रत्येक सभासदाने स्वतजवळ ठेवणे आवश्यक आहे.<br>२. कलम २६ मधील तरतूद व उपविधीतील क्रं.७अ चे पालन करणे अनिवार्य राहील.<br>३. अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीस उपस्थित राहणे.<br>४. प्रतिवर्षी वार्षीक वर्गणी ३० सप्टेंबर पूर्वी अदा करणे,<br>५. संचालक निवडणुकीस मतदान करणे पात्र सभासदांना निवडणुकीत व अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत मतदान करण्याचा अधिकार राहील. |

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे

पुणे

Sukhdev

डॉ मोरेश्वर सुखदेवे
अध्यक्ष
बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे